जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2019
तरूण भारत

# बुध्द तत्वज्ञान समजून घेतले तरच दुःख निवारण

## ज्येष्ठ विचारवंत डॉ. राजेंद्र कुंभार यांचे प्रतिपादन : 'प्रतित्यसमुत्पाद' पुस्तकाचे प्रकाशन

प्रतिनिधी
कोल्हापूर

बुद्धाचे तत्त्वज्ञान (बुद्धिझम) हे अस्वस्थतेतून उदयास आलेले तत्त्वज्ञान असून मानवी दुःखनिवारणासाठी ते मुळापासून समजून घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे लिखित 'प्रतित्यसमुत्पाद" या इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



कोल्हापूर : ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे लिखित 'प्रतित्यसमुत्पाद' पुस्तक प्रकाशन करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर. सोबत डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. ज. रा. दाभोळे, डॉ. श्रीकृष्ण महाजन.

डॉ. कुंभार म्हणाले, बुद्धाच्या तत्वज्ञानाच्या मुळाशी अस्वस्थता आहे. ज्येष्ठ तत्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे म्हणाले, बुद्धाचे प्रतित्यसमुत्पादाचे तत्त्वज्ञान आहे. हा प्रतित्यसमुत्पाद किंवा पाली भाषेत ज्याला पटिच्चसमुप्पाद म्हणतात, ते कोणतीही गोष्ट विनाकारण घडत नाही, असे सांगतानाच अनित्यवाद आणि अनात्मवाद सिद्ध करणारे तत्त्वज्ञान आहे.

डॉ. दीपा श्रावस्ती यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. जगन कराडे, डॉ. पी.एस. कांबळे, डॉ. रविंद्र श्रावस्ती, प्रा. विनय कांबळे, आर. वाय. लिधडे, डॉ. यु. के. सकट, डॉ. ए.व्ही. मोहोळकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत

संडे अँकर । बुधवारी एकच दिवस परीक्षा; दिवाळीची सुट्टी २४ ऑक्टोबरपासून

# मतदान, मतमोजणी दिवशी विद्यापीठाच्या परीक्षा नाहीत

"विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परीक्षांमध्ये बदल केला आहे. त्याची माहिती विद्यापीठातील अधिविभाग आणि महाविद्यालयांना दिल्या आहेत.

**- जी. आर. पळसे,** प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विधानसभा निवडणुकीच्या मतदान आणि मतमोजणी दिवशी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा होणार नाहीत. बुधवारी (दि. २३ ऑक्टोबर) एकच दिवस परीक्षा होईल. त्यानंतर दि. २४ ते ३० ऑक्टोबर दरम्यान दिवाळीची सुट्टी असणार आहे.

विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या हिवाळी सत्रातील (प्रथम सत्र) परीक्षांचा प्रारंभ दि. १५ ऑक्टोबरला झाला. त्याचे वेळापत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केले. त्यानुसार ऑक्टोबर-नोव्हेंबरदरम्यान बी. ए., बी. कॉम. आणि बी. एस्सी., एम. ए., एम. कॉम. आणि एम. एस्सी., बी. व्होक. पदवी, पदविका अभ्यासक्रमांच्या विविध सत्रांच्या एकूण ५९१ परीक्षा होणार आहेत. विधानसभा निवडणुकीच्या मतदानादिवशी सोमवारी (दि. २१) आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी आणि मतमोजणीच्या दिवशी गुरुवारी (दि. २४) होणाऱ्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

### या दिवशीदेखील परीक्षा नाहीत

दि. ९, १०, १६ आणि १७ नोव्हेंबरला होणारी स्वयंम् परीक्षा, १८ नोव्हेंबरला विद्यापीठ वर्धापनदिन, दि. २ आणि ९ नोव्हेंबरला अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा (राज्यसेवा), भारतीय कंपनी सचिव संस्थानतर्फे आयोजित कंपनी सेक्रेटरीची परीक्षा दि. २८ व २९ डिसेंबर या दिवशी असल्याने संबंधित दिवशी विद्यापीठाच्या कोणत्याही परीक्षा होणार नाहीत.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 OCT 2019

पुढारी

# बाजारपेठेचा अभ्यास करा : डॉ. गुरव

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** वस्तूंची कमी झालेली मागणी, बँकांची आर्थिक स्थिती, जगातील बाजारपेठेची स्थिती ही आर्थिक मंदीची कारणे असतात. त्यासाठी बाजारपेठांचा अभ्यास करून उत्पादन व गुंतवणुकीचा समतोल ठेवावा, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील कॉमर्स विभागाचे प्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित 'आर्थिक मंदी' या विषयावर ते बोलत होते. गुरव म्हणाले, मंदीच्या काळात बाजारपेठेचा गुंतवणूकदारांनी अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. भांडवली गुंतवणूक कमी करावी, संशोधन व नवनिर्मितीवर भर द्यावा, दैनंदिन खर्च कमी करावेत, पुढील पाच वर्षांसाठी योग्य नियोजन करावे. सध्या असणाऱ्या उद्योग व व्यापारामध्ये अनेक अडचणी आहेत. त्यांचा विचार करून आपल्याकडील साधनांचा वापर करावा, असे आवाहन केले. स्वागत इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष अतुल आरवाडे यांनी केले. यावेळी रणजित शहा, कमलाकांत कुलकर्णी, रामप्रताप झंवर, बाबासो कोंडेकर, श्रीकांत दुधाणे, प्रसन्न तेरदाळकर, करण चरणे व असोसिएशनचे सभासद उपस्थित होते.


# बुद्धिझम हे अस्वस्थतेचे तत्त्वज्ञान

## डॉ. राजेंद्र कुंभार | डॉ. ज. रा. दाभोळे यांच्या 'प्रतित्यसमुत्पाद' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बुद्धाचे तत्त्वज्ञान (बुद्धिझम) हे अस्वस्थतेतून उदयास आलेले तत्त्वज्ञान असून मानवी दुःख निवारणासाठी ते मुळापासून समजून घेणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे लिखित 'प्रतित्यसमुत्पाद' या इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशन पदार्थ विज्ञान सभागृहातील समारंभात झाले, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. कुंभार म्हणाले, बुद्ध तत्त्वज्ञानाचा उगम हा सिद्धार्थाच्या अस्वस्थतेमधून झाला. जगातील दुःख पाहून व्यथित झालेला संवेदनशील मनाचा सिद्धार्थ दुःख निवारणाचा मार्ग शोधण्यासाठी राजप्रासादातून बाहेर पडला आणि पुढे त्याला ज्ञानप्राप्ती झाली. त्यानंतर त्याने ज्या तत्त्वज्ञानाची मांडणी केली, त्याच्या मुळाशी ही अस्वस्थता आहे.



कोल्हापूर : डॉ. ज. रा. दाभोळे लिखित 'प्रतित्यसमुत्पाद' या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलसचिव विलास नांदवडेकर. सोबत श्रीकृष्ण महाजन, राजेंद्र कुंभार, ज. रा. दाभोळे, दीपा श्रावस्ती.

अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन म्हणाले, डॉ. ज. रा. दाभोळे यांनी बुद्ध तत्त्वज्ञानातील अत्यंत महत्त्वाच्या, पण तितक्याच दुर्लक्षित अशा प्रतित्यसमुत्पादाचे विश्लेषण करणारे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनामुळे विद्यापीठाच्या लौकिकात भर पडली आहे. हे तत्त्वज्ञान मुळापासून समजून घेण्यासाठी दाभोळे सरांचे हे पुस्तक अतिशय महत्त्वाचे ठरेल.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. दीपा श्रावस्ती यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी जगन कराडे, पी. एस. कांबळे, रवींद्र श्रावस्ती, विनय कांबळे, आर. वाय. लिधडे, यू. के. सकट, ए. व्ही. मोहोळकर यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### आयुष्यभर चांगला माणूस म्हणून राहा

यावेळी डॉ. दाभोळे यांनी १९५३ साली आपण विद्यार्थिदशेत कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकत्र आले असताना त्यांची भेट झाल्याची आठवण सांगितली. बाबासाहेबांकडे स्वाक्षरी–संदेश मागितला असता त्यांनी आयुष्यभर चांगला माणूस म्हणून राहा, असा संदेश दिल्याचे सांगितले. कर्मवीरांमुळेच आपल्याला बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची ओळख झाल्याचे त्यांनी सांगितले.

# बॅ. खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत वाचन प्रेरणा दिनानिमित्त दोनदिवसीय वाचक प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात पार पडला. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अध्यक्षीय भाषणात डॉ. पी. एस. पाटील यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे चरित्र व जीवनपट प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. यावेळी अब्दुल कलाम यांचा चरित्रपट दाखवण्यात आला.